# कौशल्याधिष्ठित अभ्यासक्रमांचे उद्देश समजून घेणे महत्त्वाचे : प्राचार्य डॉ. सपाटे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

नवीन शिक्षण धोरणाच्या धर्तीवर अभ्यासक्रमांमध्ये बदल होत आहेत. धोरण विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर अधिक भर देणारे आहे. नवीन शैक्षणिक धोरणामुळे विद्यार्थ्यांनी शिकत असलेल्या अभ्यासक्रमांमधील कौशल्ये आत्मसात करण्याची गरज आहे, असे प्रतिपादन डॉ. बापूजी साळुंखे इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनिअरिंग अ‍ॅण्ड टेक्नॉलॉजीचे प्राचार्य डॉ. सुहास सपाटे यांनी केले.

विवेकानंद कॉलेजमध्ये आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार होते. प्रा.अतिश तानगावडे यांची एमपीएससीव्दारे जिल्हा सांख्यिकी अधिकारीपदी निवड झाल्याबद्दल व प्रा. आशियाना मकानदार यांची एमएच-सेट परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करण्यात आला. संख्याशास्त्र विभागप्रमुख प्रा. वर्षा शिंदे यांनी प्रास्ताविक केले. प्रज्ञा कुंभार यांनी आभार मानले. निरुपमा देसाई, सायली शिराळे, दर्शन कणिरे यांनी सूत्रसंचालन केले. रजिस्ट्रार आर. बी. जोग यांचे कार्यक्रमासाठी सहकार्य लाभले.

VIVEKANAND COLLEGE KOLHAPUR (Empowered Autonomous) ESTD JUNE 1964